कामगार विभाग़ाच्या अधिपत्याखालील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय आणि बाष्पके संचालनालय कार्यालयातील उपसंचालक गट-अ व सहायक संचालक गट-ब संवर्गातील अधिका-यांच्या बदल्यांचे अधिकार प्रत्यार्पित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण १२१४/प्र. क्र. ७४/काम-१

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२.

तारीख: ०५ फेब्रुवारी, २०१५

वाचा :-

१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.

२) शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२००४/प्र. क्र. १५/०४/१२, दि.२५ मे,२००६

प्रस्तावना :-

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ दिनांक. १जुलै, २००६ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमाच्या कलम ६ खालील परंतुक २ व कलम ७ यामधील तरतूदी एकत्रित विचारात घेवून, कामगार विभाग़ाच्या अधिपत्याखालील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय आणि बाष्पके संचालनालय कार्यालयातील उपसंचालक गट-अ व सहायक संचालक गट-ब संवर्गातील अधिका-यांच्या बदल्यांचे अधिकार प्रत्यार्पित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन अधिनियम, २००५ मधील कलम ६ खालील परंतुक २ व कलम ७ यामधील तरतूदी एकत्रित विचारात घेवून कामगार विभाग़ाच्या अधिपत्याखालील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय आणि बाष्पके संचालनालय कार्यालयातील

उपसंचालक गट-अ व सहायक संचालक गट-ब संवर्गातील अधिका-यांच्या बदल्यांचे अधिकार खालील प्रमाणे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत.

विभाग	**पदनाम व वेतनश्रेणी**	**कलम ६ (ख) नुसार सक्षम प्राधिकारी**	**बदली अधिकार प्रत्यार्पित करावयाचा अधिकारी**	**कलम ४ (४) (एक) व ४ (५) नुसार सक्षम प्राधिकारी**
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय	उप संचालक ८०००-१३५००	मा.मंत्री (कामगार)	प्रधान सचिव (कामगार)	मा.मंत्री (कामगार)
	सहाय्यक संचालक ६५००-१०५००	मा.मंत्री (कामगार)	प्रधान सचिव (कामगार)	मा.मंत्री (कामगार)
बाष्पके संचालनालय	उप संचालक ८०००-१३५००	मा.मंत्री (कामगार)	प्रधान सचिव (कामगार)	मा.मंत्री (कामगार)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२०६११४७४६७५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Khavnekar Jayashree A

Digitally signed by Khavnekar Jayashree A
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry energy & labour department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Khavnekar Jayashree A
Date: 2015.02.06 11:57:57 +05'30'

(ज. आ. खवणेकर)

शासनाच्या अवरसचिव उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय.
२. सामान्य प्रशासन विभाग, का-१२, मंत्रालय, मुंबई.
३. सहसचिव (काम-४),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई.
४. उपसचिव (काम-९), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई.

५. संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,वांद्रे(पूर्व), मुंबई. (संचालनालयातील सर्व संबंधित अधिका-यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)

६. प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, वांद्रे(पूर्व), मुंबई.(संचालनालयातील सर्व संबंधित अधिका-यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)

७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,

८. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,

९. मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीयसहाय्यक,

१०. निवडनस्ती (कामगार-१)